कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १२/०९/२०१७

# गडचिरोली पोलीस दलातील पोलीस शिपाई याचे मुलाने स्केटींग मध्ये मिळवीली ०८ सुवर्ण पदके

पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे नेमणूकीस असलेले पोलीस शिपाई सतिश प्रभाकर मोरे यांनी त्यांचा मुलगा कुमार समर्थ सतिश मोरे, वय- ०७ वर्ष, यास शिक्षणासाठी नर्सरी पासून गुरुकूल स्कूल, कुमठे ता. तासगाव, जि. सांगली येथे आपल्या आजीकडे ठेवले आहे. गुरुकुल स्कूल मध्ये स्केटींग शिकणारे मुलांना पाहून कुमार समर्थ याने त्याचे वडील पोलीस शिपाई सतिश मोरे याचेकडे स्केटींग किट करीता हट्ट धरल्याने त्यास ते पुरविण्यात आले. अथक परीश्रमानंतर सन २०१५ ते २०१७ दरम्यान कुमार समर्थ याने विविध स्पर्धेत दैदिप्यमान यश मिळवून आतापर्यंत ०८ सुवर्ण पदक मिळविले आहेत.

बेळगाव, राज्य कर्नाटक येथे घेण्यात आलेल्या स्पर्धेत लगातार २ तास ३० मिनीटे स्केटिंग केल्याने कुमार समर्थ याचे नाव ग्रीनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंदविण्यात आलेले आहे. आगामी ऑलंम्पिक स्पर्धेत कुमार समर्थ याची निवड होण्याची शक्यता असल्याचे त्याचे प्रशिक्षक यांनी सांगितले आहे.

स्केटिंगमध्ये प्राप्त केलेल्या यशाबद्दल गडचिरोली पोलीस दलातर्फे डॉ. अभिनव देशमुख, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी कुमार समर्थ याचा व त्याचे वडील पोलीस शिपाई सतिश प्रभाकर मोरे यांचा आज दिनांक १२/०९/२०१७ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयात सत्कार करुन त्याचे कौतूक केले आहे. कुमार समर्थ यास यापुढेही अशीच खेळामध्ये यशस्वी वाटचाल

करण्यासाठी शुभेच्छा देऊन गडचिरोलीस पोलीस दलातर्फे स्केटींगचे किट देण्यात येणार असल्याचे जाहिर केले आहे.

या सत्कार प्रसंगी अपर पोलीस अधिक्षक, प्रशासन श्री. महेंद्र पंडीत, गडचिरोली तसेच जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

